मुद्द क्र. ७

कलम ४ (१)(ख)(vii)

पिंपरी चिंचवड मनपा येथील तालेरा रुग्णालय मध्ये दस्ताऐवजांची वर्गवारी

| अ.क्रं. | सल्ला मसलीतीचा विषय | कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन | कोणत्या अधिनियम / नियम / परिपत्रकांद्वारे | पुनरावृत्ती काल |
|---|---|---|---|---|
| 1 | समास्या निवारण | तालेरा रुग्णालयात नागरीकांना रुग्णसेवेबाबत सुचना व तक्रारी यासाठी सुचना / तक्रारपेटी ठेवण्यात आली आहे. प्राप्त झालेल्या सुचनेनुसार आवश्यक कार्यवाही करणे व सारथी संकेत स्थळावर व प्राप्त झालेल्या तक्रारांची योग्य ती दखल घेण्यात येते व पुर्तता करण्यात येते. | शासनाने जाहीर केलेल्या लोकशाही दिन या धर्तीवर मा.आयुक्त सो. यांच्या आदेशानुसार / नागरीकांची सनद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील तरतुदीनुसार | |
| 2 | माहिती अधिकार 2005 | केंद शासनाने जाहीर केलेल्या कायदानुसार ज्या नागरीकांना/संस्थेला कोणासही माहिती दयावयाची असेल तर विहित नमुन्यातील अर्ज व त्यावर र.रु.10/- कोर्ट फी स्टॅम्प लावून आवश्यक ती माहिती मागविता येते असा अर्ज प्राप्त झाल्यावर तो संबंधित लिपीक कर्मचा-याकडे ठराविक कालावधी | केंद्र शासनाने जाहीर केलेला माहिती अधिकार 2005 | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | देऊन<br><br>कार्यवाहीसाठी दिला जातो. पूर्ण कार्यवाही झाल्यावर या विभागाकडे प्राप्त झालेली माहिती योग्य आहे अथवा नाही याची खातर जमा माहिती अधिकारी करुन संबंधित अर्जदाराला देण्यात येते या उपरही ज्या अर्जदारास माहितीबाबत साशंकता निर्माण झालेली असेल तो अर्जदार अपिलीय अधिका-याकडे र.रु.20/- कोर्ट फी स्टॅम्प लावून पुन्हा अपिल करु शकतो. अश्या प्रसंगी अपिलीय अधिकारी सुनवाणी घेऊन त्यावर निर्णय देतात. | | |
| 3. | राष्ट्रीय आरोग्य कार्यकम | तालेरा रुग्णालयातील राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाचे उदिष्टे वैद्यकीय मुख्य कार्यालयातील मा.वैद्यकीय संचालक तथा अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून दिली जातात. अमंलबजावणी | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | तालेरा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कुटुंब कल्याण विभागातील कर्मचा-यांमार्फत करण्यात येते. काही बाबीमध्ये समाज प्रबोधनाची अत्यंत आवश्यकता असते व उद्दिष्ट्ये पूर्ततेसाठी त्याचा फायदा मिळतो. उदा. जननी सुरक्षा योजना, प्रसवपुर्व गर्भलिंग तपासणी (PCPNDT Act ) याबाबत पथनाटय, माहिती पत्रिका, झोपडपटटयांमध्ये साथीचे रोग आटोक्यात आणण्यात (कीटकजन्य आजार) उदा. डेंगी, मलेरिया – जनतेला प्रबोधन देण्यात येऊन कोरडा दिवस पाळण्याचा आवाहन कुटुंब कल्याण विभागातील कर्मचा-यांकडून केले जाते. | | |
| 4 | धन्वंतरी स्वास्थ्य योजना 2013 | पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील कायम स्वरुपी कार्यरत असणा-या कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबीयाना | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | (पती, पत्नी व 21 वर्ष पर्यंतची 2 आपत्ये ) वैद्यकीय सुविधा पुरविल्या जातात तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांनाही या सुविधेचा लाभ दिला जातो. | | |